**पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - १ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग,
चेंबुर, मुंबई-४०००७१
दुरध्वनी क्र. **022&25229303**
Email ID-
dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com





**प्रेस नोट**
**दिनांक - २०/८/२०२६**
**(शिवाजीनगर पोलीस ठाणे)**

# शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दाखल खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीतास मा. सत्र न्यायालयाने आजन्म कारावासाची व दंडाची शिक्षा सुनावली

दिनांक २०/०८/२०२६ रोजी मा. मुख्य सत्र न्यायाधीश श्री यु.के.सोरटे, ४७ वे शहर सत्र न्यायालय, मुंबई यांनी शिवाजी नगर पोलीस ठाणे गु.र.क्र. २५४/२०२० सत्र प्रकरण क्र.८२०/२०२५ या खून प्रकरणात आरोपी अफसर अब्दुल शेख उर्फ पंछी यास दोषी ठरवून आजन्म कारावासासह विविध कलमांखाली शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी अफसर अब्दुल शेख उर्फ पंछी याचे विवाह बाह्य संबंध असल्याने सदर गुन्ह्यातील फिर्यादी नसरुद्दीन जुल्फिकार चौधरी याचे वडील जुल्फिकार चौधरी यांनी हरकत घेतली होती. त्याचा राग मनात धरून आरोपीने जुल्फिकार चौधरी यांना जीवे ठार मारण्याची धमकी देवुन त्यांच्या छातीवर, पोटावर व हातावर चाकूने वार करून त्यांना गंभीर जखमी केले, केलेल्या दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाला. नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांनी शिवाजीनगर पोलीस ठाणेस तक्रार दिल्यावरुन शिवाजीनगर पोलीस ठाणे गु.र.क्र.२५४/२०२० भा.दं.वि. कलम ३०२, ३०६(२) आर्म अक्ट १९५९ कलम ४ व २५ महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ कलम ३७(१)(अ) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणामध्ये तपास अधिकारी मपोउपनि मिना व्हराडी, सपोनि विलास राठोड यांनी केलेला सखोल, शास्त्रीय व प्रभावी तपास, सबळ पुराव्यांचे संकलन व त्याचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण, तसेच सरकारी अभियोक्ता श्री. चौधरी साहेब, श्री. लाडे साहेब व पैरवी अधिकारी_ विजय ठाकुर यांनी न्यायालयासमोर प्रभावीपणे सादरीकरण करणे, सदर प्रकरणाचे न्यायालयीन कामकाज पाहणारे अधिकारी सपोनि कष्णांत माने यांनी सरकारी पक्षाशी योग्य समन्वय साधणे तसेच सातत्यपूर्ण व परिणामकारक पैरवी करणे यामुळे आरोपीविरुद्धचा गुन्हा संशयाचा फायदा न देता सिद्ध होऊन त्यास कठोर आजन्म कारावासाची शिक्षा मिळाली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, का व सु, श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ ०१, समीर शेख,सहाय्यक पोलीस आयुक्त श्री कलीम शेख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक धनंजय शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप पगारे, सपोनि कष्णांत माने, पोलीस उप निरीक्षक विजय ठाकुर, पोलीस हवालदार देवरे, पोलीस शिपाई माने, गोगावले, मपोशि सोनवणे व झेले यांनी केली आहे.

***